# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - IV

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

उ.१ अ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

**निरंजनला या प्रश्नांची उत्तरे धडाधड येत होती**

↓

| | |
|---|---|
| १ | नागरिकांची कर्तव्ये कोणती ? |
| २ | उत्तम नागरिक कुणाला म्हणावे ? |
| ३ | लोकसभा म्हणजे काय ? |
| ४ | ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो ? |

(२) (i) **योग्य पर्याय निवडा.** 1

भडसावळे गुरुजींनी निरंजनला वार लावून दिले **थोरामोठ्यांच्या घरी**

(ii) **सकारण लिहा.** 1

निरंजन आज मनोमन खूश होता कारण **आधीचे पेपर्स चांगले गेले होते.**

(३) **व्याकरण :**

(i) **अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** 1

मामी गेली ती पुन्हा परतली नाही.

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

(i) अधोगती × प्रगती (ii) अप्रामाणिक × प्रामाणिक

(४) **स्वमत :** 2

अक्षय हा माझा मित्र. घरची परिस्थिती यथातथाच असून तो नेटाने शिकत आहे. दिवसभर स्वत: मोलमजूरी करून तो रात्रशाळेत शिकतो. माझी आई प्रत्येक सणवाराला त्याला जेवायला बोलावते. गोडधोड खाऊ

घालते. माझ्यासारखे त्याला कपडेही घेऊन देते. माझे वडील त्याची वर्षभराची फी भरतात. मी ही जमेल तेवढी त्याला अभ्यासात मदत करतो. त्याचे वडील वाहनचालक आहेत. माझे वडील त्यांनाच गाडी चालवण्यासाठी बोलावून महिन्याभराचा पगार देतात.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(i) लेखक वाघिणीची पिल्ले बघण्यासाठी अधीर होता. 1

(ii) 'जमिनीवर पडलेल्या वाळक्या पाचोळ्यावरून पाय न वाजवता जाण' ही लेखकासाठी मोठी कसरत होती. 1

(२) (i) **योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.** 1

लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात **धोकादायक जनावर !**

(ii) **सहसंबंध लिहा.** 1

ओलसर : चिखल :: पानांची : **सळसळ**

(३) **व्याकरण :**

(i) **काळ ओळखा.** 1

भूतकाळ

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

वर - शब्दयोगी अव्यय

(४) **स्वमत :** 2

आजही तो प्रसंग डोळ्यांसमोर जसाचा तसा आठवतो. 'द ग्रेट रॉयल सर्कस' चा अविस्मरणीय प्रसंग चित्तथरारक होता. सर्कशीची सुरुवात अतिशय शानदार झाली. एका पायावरच्या कसरती झाल्या. मग खास आकर्षण असणारा सिंह पिंजऱ्यात आणला गेला. पिंजऱ्यातून त्याला बाहेर काढले, मग रिंग मास्टर ने त्याला पेटलेल्या चक्रातून उडी मारण्याचा हुकूम दिला.सिंहाने ५ उड्या मारल्या, सर्वांनी टाळ्यांचा गजर केला. रिंग मास्टरने देखील त्याला हंटर दाखवून पुन्हा पिंजऱ्यात जाण्याचा आदेश दिला. आता मात्र सिंहाने तो आदेश साफ नाकारला. तो तेथूनच रिंगणातून पळत सुटून प्रेक्षकांच्या दिशेने धावत गेला. एकच हाहा:कार माजला. सगळे लोक गडबडले. किंचाळ्या आणि आक्रोशांनी परिसर गंभीर झाला. लोक इतस्तत: धावू लागले. चेंगराचेंगरीत अनेकांना गंभीर दुखापती झाल्या. सिंह येऊन आपल्याला खाणार या भीतीने मृत्यूच डोळ्यांपुढे दिसू लागला. सर्कशीतील कलाकारांची तारांबळ उडाली. अनेक खुर्च्या तुटल्या. सर्कशीच्या तंबूलाही आग लागली. जो तो जीव घेऊन पळत सुटला. अनेकांच्या प्रयत्नांनी परिस्थिती आटोक्यात आली. सिंहाला पकडून पुन्हा पिंजऱ्यात टाकण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| | **अपठित गद्य** | |
| उ.१ | **इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** | |
| (१) | **खालील कृतीचा परिणाम लिहा.** | |
| | (i) मुंबईच्या स्टेशननजीक राहणारे परगावी गेले तर त्यांना आगगाड्यांच्या धडधडाटाशिवाय झोप येत नाही. | 1 |
| | (ii) ट्रान्झिस्टर लावून अभ्यास करणाऱ्यांना ट्रान्झिस्टर नसला तर त्यांचा अभ्यास व्हायचा नाही. | 1 |
| (२) | **(i) सहसंबंध लिहा.** | 1 |
| | आगगाड्यांचा : धडधडाट :: इंजिनांच्या : **कर्कश शिट्या** | |
| | **(ii) एका वाक्यात उत्तर लिहा.** | 1 |
| | माणूस सवयीचा गुलाम असतो. | |
| (३) | **व्याकरण :** | |
| | **सूचनेनुसार सोडवा.** | 2 |
| | (i) भूतकाळ | |
| | (ii) त्यांच्या - सर्वनाम | |
| (४) | **स्वमत :** | 2 |
| | माणसाने कधीही सवयीचे गुलाम नसावे. मनुष्याला खूप वेगवेगळ्या प्रकारच्या सवयी असतात. मग त्या रोजच्या जीवनातील असू द्यात किंवा त्याच्या नित्य कामातील असू द्यात. व्यक्ती सवयीचा इतका गुलाम असतो की, त्याशिवाय त्याचे पाणीही हालत नाही. | |
| | उदा. (१) एखाद्या व्यक्तीस ठरलेल्या वेळेत जेवण मिळाले नाही तर त्याची चिडचिड होते. तो घरातील स्त्रियांवर राग व्यक्त करतो. आवडता पदार्थ पानात वाढला गेला नाही तर तो जेवतही नाही. | |
| | उदा. (२) एखाद्या विद्यार्थ्यास खूप वेळपर्यंत झोपण्याची सवय असेल आणि अचानक एखाद्या दिवशी त्याला लवकर उठावे लागले तर तो पूर्ण दिवस बसेल तेथे डुलक्या काढताना दिसतो. त्या अपूर्ण झोपेचा परिणाम त्याच्या पूर्ण दिवसाच्या कामावर दिसून येतो. | |
| | माणसाने प्रत्येक गोष्टीला प्रसंगानुसार सामोरे जावे. त्याने दोन्ही गोष्टी सकारात्मक विचाराने स्वीकारल्या पाहिजेत. मग बघा आयुष्य किती सुंदर आहे. म्हणून कोणत्याही माणसाने सवयीचे गुलाम नसावे. | |
| | **विभाग २ – पद्य** | |
| उ.२ | **अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** | |
| (१) | **चौकट पूर्ण करा.** | 2 |
| | (i) फुलामुलांतून हसणारा - श्रावण | |

| | | |
|---|---|---|
| | (ii) मातीचे मंगल - तनमन<br>(iii) चैतन्याचे - सुदर्शन<br>(iv) अपरंपार धन - शेतातील मोती | |
| (२) | **(i) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.**<br>शक्तीचीही झडते **नौबत**. | 1 |
| | **(ii) एका वाक्यात उत्तर लिहा.**<br>कवी आभाळावर उत्क्रांतीचा ललकार घुमवायला सांगतात. | 1 |
| (३) | **खालील काव्यपंक्तीतून सूचित होणारा अर्थ लिहा.**<br>इथे जन्माला येणारे प्रत्येक बाळ तेजस्वी व प्रबळ असेल. देशाचे रक्षण करण्यासाठी, नवीन कार्यासाठी घराघरातून जणू नवी पिढी जन्म घेईल आणि आपल्या शक्तीतून, आपल्या कार्यातून आपल्या विजयाचा अवतार साऱ्या जगासमोर उभा करेल. म्हणजेच सामर्थ्यशाली बालके जन्मास येऊन देशाचे भविष्य नक्कीच उज्ज्वल करतील, असा एक आशावाद कवीने येथे मांडलेला आहे. | 2 |
| (४) | 'स्वप्न करू साकार' कवितेत कवी 'किशोर पाठक' यांनी देशाच्या उज्जवल भविष्याचे स्वप्न रंगविले आहे. देशात नव्या पिढीचे आगमन होत आहे. नवे युग चालू आहे तेव्हा नवीन कल्पना, नवी उमेद आहे. कवीला देशाच्या मातीतून मोती पिकवायचे आहेत. भरघोस धान्याचे पिक घ्यायचे आहे. मातीचा कस सुधारायचा आहे. श्रावणसरींनी हसणाऱ्या, फुलणाऱ्या फुलांना व मुलांना पहायचे आहे. श्रमप्रतिष्ठेवर भर देऊन प्रयत्नांची कास धरायची आहे. औद्यौगिक प्रगती करायची आहे. एकोप्याने देशाची वैभव संपदा केवळ जपायचीच नाही तर वाढवायची आहे.<br>नव्या पिढीला श्रमशक्ती, यंत्र यांचा मंत्र द्यायचा आहे. देशासाठी झटणारे शुभंकर, कल्याणकारी हात तयार करायचे आहेत. देशाचे नाव उज्ज्वल करून सगळ्या जगात आपल्या देशाचा नावलौकिक वाढवायचा आहे. | 2 |
| उ.२<br>(१) | **आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**<br>**चौकटी पूर्ण करा.**<br>(i) फुटते शरीरभर पालवी याचा अर्थ – नवउत्साह<br>(ii) अलगद उतरणारे थेंब – दव<br>(iii) कवीच्या मते उत्साही आयुष्य म्हणजे – फुलासारखं टवटवीत<br>(iv) पानझडीनंतरचे, नवी वस्त्रे धारण करणारे झाड म्हणजे – नवी नवरी | 2 |

(२) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

**झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी**

- शरीरभर हिरवा रंग विरघळतो
- रक्त क्षणभर हिरवेगार होते

(३) **पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** 2

पक्षी झाडांवर सतत येत असतात. घरटे बांधून राहतात. काम झाले की, फळे चाखून, खाऊन पुन्हा दुसरीकडे उडून जातात. झाड त्यांना निवारा देते, अन्न देते. ऊन-पावसापासून रक्षण करते, पण जेव्हा झाडावर घाव घातले जातात, ते कापले जाते तेव्हां पक्षी स्वत:चाच विचार करून झाडावरून उडून जातात. परंतु, झाड मात्र हिरवेगार असताना येणाऱ्या पक्ष्यांना कधीही अडवत नाही, आश्रय नाकारत नाही. म्हणूनच पक्षी झाडांचे कुणीही नसून झाड त्यांचे असते असे कवी म्हणतात.

(४) झाडांचे मानवी जीवनातील स्थान अतुलनीय आहे. संपूर्ण पर्यावरण झाडांवर अवलंबून आहे. 2
निसर्गाचे संतुलन राखण्यात झाडे अग्रेसर आहेत. झाडांमुळे फळे, फुले, औषधे तर मिळतांतच, पण थकलेल्या जीवाला सावली मिळते. झाडांमुळे पाऊस पडतो. झाडे मानवी जीवनातील 'श्वास' च आहेत. त्यावाचून आपले जीवन जगणे अशक्य आहे.

उ.२ **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** 4

(१) सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या जवानाला त्याच्या देशवासीयांकडून औक्षण केले जात आहे. याचे इंदिरा संत यांनी अत्यंत हृदयद्रावक वर्णन केले आहे.

युद्धभूमीत शस्त्रांचा, तोफांचा भडिमार आहे. अशा वेळेस जवानाच्या मागेपुढे खाली-वर सर्वत्र बंदुकीच्या गोळ्या झाडल्या जात ओहत. तोफा डागल्या जात आहेत. त्याचे कर्कश आवाज आहेत. दारूगोळ्यांचा स्फोट व धुराचे कल्लोळ आकाशात दिसत आहेत. सर्वत्र भीतीचे, युद्धाचे, आक्रमकतेचे सावट आहे. डोक्यावर मृत्युची तलवारच आहे. या परिस्थितीतही न डगमगता हा जवान धैर्याने पुढे जात आहे. देशासाठी लढण्याची त्याची जिद्द प्रशंसनीय आहे.

'बंबारा' या शब्दाकरीता 'घोंघावे' हे विशेषण व तोफांकरीता 'धडाडत्या' हे विशेषण वापरून युद्धचित्र शब्दबद्ध केले आहे. गांभीर्याची भावना प्रगट करण्यासाठी नेमके शब्द वापरले आहेत. वीररसाच्या या काव्यपंक्ती जवानाचे शौर्य व जिद्द दर्शवितात. धुराचे, जिद्दीचे या शब्दांनी यमक साधले आहे.

## विभाग ३ – स्थूलवाचन

उ.३. **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**

(१) वाळवंटी प्रदेशात कॅक्टसचे रोप लहान असते तेव्हा त्याला दोन चार लहान पाने येतात. नंतर ते कॅक्टस बिनपानांचे राहते. याचे मुख्य कारण म्हणजे झाडाचे बरेचसे पाणी त्यांची पाने बाष्पीभवनाने गमावतात त्यामुळे कॅक्टसच्या झाडाने पान ही गोष्टच काढून टाकली आहे. कॅक्टसच्या झाडामध्ये रसदार गर 3

असतो, म्हणून त्यावर प्राण्यांच्या धाडी पडण्याचा धोका असतो. त्यासाठी खबरदारी म्हणून कॅक्टस झाडाच्या अंगावर धारदार बोचरे काटे पसरलेले असतात. तसेच वाळवंटातून प्रवास करणारे लोक तहान भागवण्यासाठी कॅक्टसचे घट्ट साल सोलून त्यातील गरातील पाणी पितात. पण त्याचे काटे फार धारदार असतात. ते सारे तोडून काढून फक्त वाटीभर पाणी मिळवणे खूप त्रासाचे असते. अगदी निरुपाय झाला तरच प्रवासी ही मेहनत घेतो. जनावरांनी ओरबाडून खाऊ नये म्हणून ह्या झाडांनी काट्यांची शस्त्रे केली आहेत.

(२) पाण्याला समानार्थी शब्द 'जीवन' असा आहे. त्यावरून पाण्याचे अमूल्य महत्त्व लक्षात येते. जीवनात पाणी नसेल तर तहानेने व्याकूळ होऊन माणूस मरेल. स्वच्छता राहणार नाही. पशू-पक्षी, झाडे निसर्ग टिकणार नाही. सर्व सृष्टी उजाड होईल. वाळवंट, ओसाड राने तयार होतील. जीवसृष्टी राहणार नाही. जलचर प्राण्यांची सृष्टी नष्ट होईल. सूर्य आग ओकेल. जमिनीला मोठे तडे जातील. पाण्यावाचून हाहा:कार होईल. जीवनच संपुष्टात येईल. म्हणून पाण्याचा योग्य वापर करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. 3

(३) **खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)** 3

१९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव संमेलनात मंजूर करण्यात आला. सर्वांच्या मतानुसार हे कार्य कृ. पा.कुलकर्णी यांच्यावर सोपविण्यात आले. बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली. तसेच सर्वांच्या सहकार्यामुळे १९४६ साली 'मराठी व्युत्पत्ती कोशाचे' पहिले प्रकाशन झाले.

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | **बरेवाईट** | बरे अथवा वाईट | वैकल्पिक द्वंद्व समास |
| (ii) | **कृष्णार्जुन** | कृष्ण आणि अर्जुन | इतरेतर द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** 2

खालील ओळीतील उपमेय, उपमान, साम्यवाचक शब्द व समान धर्म (गुण) असे वर्गीकरण करा.

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| आंबा | साखर | सारखा | गोड |

(iii) **वाक्यरूपांतर**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. स्टेशन इथून जवळ नव्हतं. 1

२. तहान शमवण्यासाठी हे पाणी प्या. 1

(iv) **सामान्यरूप कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. त्याने यशाचे शिखर गाठले. 1

२. अन्यायविरुद्ध मला चीड येते. 1

(v) **वाक्प्रचार**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. अचानक दारात मामा-मामींना बघून सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला. 1

२. कौस्तुभने बुद्धिबळ खेळात शाळेचे नाव उज्ज्वल केले. 1

उ.४ **(ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. झपाझप - भरभर, जलद    २. सूक्ष्म - बारीक

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

१. कळत × नकळत    २. वाकडे × सरळ

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** 1

दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा - मनकवडा

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** 1

वीज ← चपला → चप्पल

(२) **लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** 1

१. व्यंगचित्र    २. स्मृतिदिन

(ii) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** 1

अभिषेक-स्नेहलचे बाबाही तयार होऊन हॉलमध्ये आले.

(३) **विरामचिन्हे**

**खालील वाक्यातील विरामचिन्हे शोधून त्यांची नावे लिहा.** 2

''मावशी तुम्ही राहता कुठं ?''

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| '' '' | दुहेरी अवतरण चिन्ह |
| ? | प्रश्नचिन्ह |

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** 1

१. Zone - परिमंडळ, विभाग २. Courtyard - अंगण

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** 1

आकार, इकार, उकार, मकार

**विभाग ५ – उपयोजित लेखन**

उ.५ **अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** 5

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

(i) दिनांक : ५ जून, २०१८

प्रति,

मा. व्यस्थापक

हिरवाई ट्रस्ट,

बालोद्यान मार्ग,

तळेगाव, दाभाडे.

**विषय :** शाळेतील उद्यानासाठी रोपांची मागणी.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार,

मी अ.ब.क. ज्ञानेश्वरी विद्यालय या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या परवानगीने हे पत्र लिहित आहे.

प्रतिवर्षी आमची शाळा विविध उपक्रम राबवते. या वर्षी आम्ही शाळेच्या सुरुवातीलाच (५ जून) जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शाळेच्या उद्यानात रोपे लावण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठीचे सर्व नियोजन आम्ही आमच्या मुख्याध्यापक व गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. आम्हांला काही रोपांची आवश्यकता आहे.

शाळेच्या उद्यानात जी रोपे लावायची आहे त्याची यादी मी खाली देत आहे.

| क्र. | रोपे | संख्या |
|---|---|---|
| (१) | गुलाब | ३० |
| (२) | मोगरा | २० |
| (३) | शोभेची झाडे | २० |
| (४) | शेवंती | २० |
| (५) | लिली | १० |

शाळेतील उद्यानासाठी ही रोपे हवी आहेत. आपण ती लवकरात लवकर पाठवावीत ही विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व,

आपला कृपाभिलाषी,

अ.ब. क.
(विद्यार्थी प्रतिनिधी)
ज्ञानेश्वरी विद्यालय,
गोकर्ण पथ, औंध.

(ii) दिनांक : २५ जून, २०१८

प्रति,
माननीय व्यस्थापक
हिरवाई ट्रस्ट,
बालोद्यान मार्ग,
तळेगाव, दाभाडे.

**विषय** : आपण राबवलेल्या चांगल्या उपक्रमाबाबत अभिनंदन.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार,

'हिरवाई' ट्रस्ट आपले त्रिवार अभिनंदन ! अभिनंदन !! अभिनंदन !!! दिनांक ५ जून 'जागतिक पर्यावरण दिन' या दिवसाचे औचित्य साधून आपण आपल्या ट्रस्ट कडून 'झाडे लावा..... झाडे जगवा' या बीद्र वाक्याचे पालन करत आपले शहर व शहराबाहेर विविध खेडेगावात मोफत रोपांचे वाटप केले. लोकांना पर्यावरणाचे मोल समजून सांगून आज पर्यावरणाचा समतोल कसा साधावा ? याची माहिती देऊन आजच्या काळात झाडे लावणे का आवश्यक आहे हे पटवून दिले व लोकांना झाडे लावण्यास प्रोत्साहित केले.

या आपल्या पर्यावरणाच्या जागृतीबाबत व अशा प्रकारच्या राबवलेल्या कार्यक्रमाबाबत मी अ.ब.क. ज्ञानेश्वर विद्यालय या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आपले अभिनंदन करण्यासाठी हे पत्र आपणास लिहित आहे. असेच विविध सामाजिक उपक्रम आपल्या हातून पूर्ण होवोत ही सदिच्छा.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व,

आपला नम्र,
अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानेश्वर विद्यालय,
गोकर्ण पथ, औंध.

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

विदूषक, सोंगाड्या आणि बहुरूपी हे समाजाला हसवणारे घटक आहेत. सगळ्यांच्या विनोदाची पद्धत आणि ठिकाणे जरी वेगळी असली तरी सर्वांना खळखळून हसवणे हाच त्यांचा उद्देश असतो. त्यांच्या विनोदातून करणुकीबरोबरच वैचारिक प्रबोधनही होत असते.

उ.५ **आ. खालील कृती सोडवा.**

(१) **जाहिरात लेखन** 6

**खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा :**

**२ वर १ मोफत**

ठंडा ठंडा ........ कूल - कूल ........

**आस्वाद आईस्क्रीम पार्लर**

**आमच्याकडे सर्व प्रकारची व सर्व चवींची आईस्क्रीम मिळतात.**



| | | | |
|---|---|---|---|
| १. | मँगो | - | २० रु |
| २. | सीताफळ | - | ३० रु |
| ३. | बटरस्कॉच | - | ४० रु |
| ४. | टुटीफ्रुटी | - | ३५ रु |

**पत्ता** : आईस्क्रीम पार्लर, महात्मा गांधी रोड, महेश ट्युटोरियल्ससमोर, ठाणे (प.)

।। ग्राहकांचे समाधान हेच आमचे ध्येय ।।

(२) **कथा लेखन** 6

**खाली दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा.**

**कष्टाळू गीता**

महाड येथे भोसले नावाचे एक श्रीमंत कुटुंब राहत होते. गीता ही त्या कुटुंबातील एकुलती एक मुलगी. त्यामुळे साहजिकच सर्वांची लाडकी पण गीताने कुटुंबातील सर्वांच्या मनाविरूद्ध एका गरीब तरूणाशी लग्न केले. झाले, सर्वांना तिचा खूप राग आला. घरातील सर्व लोकांनी तिच्याशी संबंध तोडले.

लग्नानंतर पहिल्या दिवाळीला ती माहेरी आली. तिला वाटले, आता तरी आईवडिलांचा राग शांत झाला असेल. पण छे! तिच्या आईवडिलांनी तिचा गरिबीवरून अपमान केला. कोणीही तिच्याशी प्रेमाने बोलले नाही. तेव्हा तिने माहेरी परत न येण्याचा निश्चय केला.

नवरा-बायको दोघांनी मिळून प्रामाणिकपणे कष्ट करून आपली गरीबी नष्ट करण्याचा निर्णय घेतला. हळूहळू दिवस पालटू लागले. घर सुख-समृद्धी व धन-धान्याने भरून गेले. आता त्यांना कोणत्याच गोष्टीची कमी नव्हती.

अशी खूप वर्ष लोटली. बारा वर्षांनंतर गीताचा भाऊ अचानक तिच्या घरी आला. गीताला अतिशय आनंद झाला. तिने त्याचे प्रेमाने स्वागत केले. भावाने तिचा सुखी संसार पाहिला. त्याला पूर्वी गरिबीवरून आपल्या बहिणीचा केलेला अपमान आठवला. आपल्या चुकीची जाणीव होऊन आपल्या कृतीचा त्याला अतिशय पश्चात्ताप झाला.

उ.५ **इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** ४

(१) **मी राष्ट्रध्वज बोलतोय**

मी राष्ट्रध्वज, आपल्या भारत देशाच्या अस्तित्वाचे प्रतीक. मी म्हणजेच अखंड हिंदुस्थान. मी म्हणजेच सुजलाम्, सुफलाम् भारतभूमी. मी आज ज्या डौलाने फडकत आहे त्यास प्रचंड मोठा इतिहास आहे. माझ्या सुपुत्रांनी स्वत:चे बलिदान देऊन माझे रक्षण केले. जीव त्यागला परंतु मला मातीत मिसळू दिले नाही. ते स्वातंत्र्याचे समर आठवले की आजही अंगावर रोमांच उभे राहतात.''

भारतातील छोट्या-मोठ्या राज्यांचे स्वत:चे ध्वज होते परंतु मी खऱ्या अर्थाने जन्माला आलो ते १८५७ च्या रणसंग्रामात. त्या उठावामधे जाती, धर्म, राज्य, प्रांत हा भेद नव्हता. भारतीय व इंग्रज यांच्यातला तो संघर्ष होता. ब्रिटीशांच्या 'युनियन जॅक' समोर भारतीयांच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रतीक म्हणून हिरव्या रंगाचा व चारही बाजूंनी सोनेरी पट्टा असणारा झेंडा फडकवला गेला. या ध्वजाने सर्वांना त्वेषाने लढायची प्रेरणा दिली. ''शान न इसकी जाने पाये, चाहे जान भले ही जाये...'' या बिरूदाला जागून अनेक वीरांनी आपला देहही माझ्यासाठी ठेवला. त्यांच्या बलिदानाची आठवण आता अंगावर दिसू लागली. सोनेरी पट्ट्याचे रूपांतर केशरी रंगात झाले. स्वातंत्र्याच्या लढ्यात माझ्या स्वरूपात अनेक बदल झाले. मादाम कामा यांनी भारताचा झेंडा गौरवाने फडकवला. त्यावर कमळाचे फूल, चंद्र, सूर्य यांचाही समावेश करण्यात आला. त्यानंतर हिरव्या व केशरी पट्ट्यात पांढरा रंग आला. त्यावर 'वंदे मातरम्' ही अक्षरे झळकू लागली. गांधीजींच्या सत्याग्रहाची निशाणी चरखा दिमाखात विसावला. १५ ऑगस्ट १९४७ या स्वातंत्र्यदिनी मी रात्री १२ वाजता मोठ्या अभिमानाने फडकून जगाला सांगितले, आम्ही स्वतंत्र झालो आहोत. माझे तेव्हा स्वरूप होते केशरी, पांढरा व हिरवा पट्टा व त्यातील पांढऱ्या पट्ट्यावर होते सारनाथ येथील अशोकस्तंभावरील अशोक चक्र!''

''केशरी रंग हा देशभक्तांच्या, क्रांतिकारकांच्या बलिदानाचे प्रतीक आहे. शुभ्र पांढरा रंग संयम, शांतता यांचे प्रतीक आहे. हिरवा रंग सुजलाम्, सुफलाम् समृद्धीचे प्रतीक आहे तर निळ्या रंगाचे अशोक चक्र गतिमान प्रगतीचे प्रतिक आहे. माझ्यासाठी माझ्या अनेक सुपुत्रांनी स्वत:च्या प्राणांची आहुती दिली. बारा-तेरा वर्षांच्या शिरीष कुमारपासून ८० वर्षांच्या लाला लजपतरायांपर्यंत सर्वांनी माझ्यासाठी बलिदान दिले. परंतु मला जमिनीवर पडू दिले नाही. त्या पिढीकडे व आजच्या पिढीकडे पाहिले की मन विषण्ण होते. काय ही आजची पिढी! १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोनच दिवशी तुम्हाला माझ्यासमोर येऊन सलामी द्यायची असते; परंतु आपले हे परम राष्ट्रीय कर्तव्य विसरून तुम्ही 'हॉलीडे' साजरा करता. सकाळी उठून 'ध्वजवंदन' करण्याऐवजी निवांत झोपता. एखाद्या ठिकाणी झेंडावंदन होत असेल, राष्ट्रगीत म्हटले जात असेल तर दोन मिनिटे उभे राहून मला सलामीदेखील आपल्याला देता येत नाही. आपण आपल्या राष्ट्रगीताची टिंगल करतो, अपमान करतो हे चूक आहे याची जाणीव सुद्धा तुम्हाला नसते. झेंडावंदनानंतर कित्येक झेंडे मातीत, कचऱ्यात पडलेले असतात. तुमच्या संवेदना इतक्या बोथट झाल्या आहेत का?

राष्ट्रीय अस्मिता मेली तर तुम्ही मेलात. शेवटी तुमच्या अस्तित्वाला तुम्हालाच जपले पाहिजे. आज मी क्रीडांगणापासून, रणांगणापर्यंत, संसदेपासून-शाळांपर्यंत सर्वत्र अभिमानाने फडकत आहे. मला याच गर्वाने मिरवू द्या, कारण अखेर मी म्हणजे तुम्ही व तुम्ही म्हणजे मी. चल बेटा येतो मी, जय हिंद!''

(२) **अकस्मात पडलेला पाऊस** ४

चातक पक्षी जेवढ्या आतुरतेने पावसाची वाट पाहतो, तेवढ्या आतुरतेने आम्ही पावसाची वाट पाहत होतो. पाऊस तरी किती लहरी! बघा नां, शाळा तेरा जूनला सुरु झाली, आता तर आठवडा उलटून गेला होता. आम्ही मुले नवीन गणवेश, नवीन वह्या, पुस्तके घेऊन शाळेत जात होतो. 'मे' महिन्यातील सुट्टीमुळे आरामाची सवय लागली होती. एका रविवारच्या सुट्टीवर भागत नव्हते. आम्ही विद्यार्थी चातकासारखी पावसाची वाट पाहात होतो. पावसाला विनंती करून, गाणी गाऊन बोलावत होतो. 'येऽरे येऽरे पावसा, तुला देतो पैसा!' 'सांग-सांग भोलानाथ पाऊस पडेल कां? शाळेभोवती पाणी साचून सुट्टी मिळेल कां?' छे! पण पावसाचा काही पत्ता नव्हता. अंगाची लाही लाही होत होती. त्यामानाने अंग ओलेचिंब होत होते. तरी पावसाचा पत्ता नव्हता. पाऊस कधी येणार याबद्दल सर्वत्र चर्चा होत होती.

मला आठवते, तो मंगळवारचा दिवस होता. आकाश अंधारून आले होते. अचानक आकाशात काळ्याकुट्ट्या ढगांनी गर्दी केली. त्याचबरोबर सोसाट्याचा वारा सुटला. वाऱ्याबरोबरच सर्वत्र धूळ, केरकचरा, उडत होता. झाडे, घरावरचे पत्रे धाड्धाड् आवाज करू लागले. जोरजोरात हलू लागले. आकाशात ढगांची गर्जना सुरू झाली. पक्षी, जनावर भेदरली, घाबरली व आश्रयाच्या दिशेने पळू लागली. इतक्यात विजाही चमकू लागल्या, रस्त्यातील बायका मुलांची धांदल उडाली. जो-तो पळू लागला.

अचानक पावसाला सुरुवात झाली. सुरूवातीला पावसाचा जोर कमी होता. आम्ही मुलांनी शाळेत आनंदाने उड्या मारल्या. आरडा-ओरडा सुरु केला. त्यावेळी शाळेचीही वेळ संपल्याने सुट्टीची घंटा झाली. शाळेबाहेर बरेचसे पालक आपापल्या पाल्यांना घ्यायला आले होते. संपूर्ण शाळा सुटल्याने गेटवर गर्दी झाली होती. आम्ही अर्धा रस्ता पार केला असेल नसेल तोच पावसाचा वेग वाढला. पावसाच्या धारा जोराने कोसळू लागल्या होत्या. पालकांनी आणलेला रेनकोट, छत्र्यांचा काही उपयोग नव्हता. आम्ही मुले पावसात भिजण्याचा, नाचण्या व गाण्याचा मनसोक्त आनंद घेत होतो.

घरांच्या छपरांवरून पावसाचे पाणी धो-धो कोसळत होते. थोड्या वेळात रस्त्यांना नाल्याचे स्वरुप आले. वातावरणात मातीचा पहिला सुगंध दरळवत होता. झाडे-वेली सर्वजण जसे आनंदाने पावसाचे स्वागत करत होते. या पावसाचे मानवावर नव्हे सर्वांवरच केवढे उपकार! पाऊस तहान भूक भागवितो. मानवाचे जीवन उत्साहीत व आनंदीत करतो. असा विचार करत मी घराकडे चाललो असतानाच माझा पाय एका खड्ड्यात गेल्याने मी तोल जाऊन पाण्यात पडलो. पडणारा पाऊस, वाहणारे पाणी, आरडा-ओरडा करणारे मित्र मला क्षणभर कळेच ना. काय करावे ते? हसणे संपल्यावर मित्रांनी मदतीचा हात पुढे केला. मी कसाबसा उभा राहिलो. कपडे, पुस्तके तर केव्हाच भिजली. चष्मा फुटला व कमेरालाही बऱ्यापैकी लागले होते. मित्रांच्या मदतीने लंगडत-लंगडत घरी पोहोचलो. पण अचानक आलेल्या पावसात भिजण्याचा व नंतर बरे होईपर्यंत मिळणाऱ्या सुट्टीचा आनंद मी कधीही विसरणार नव्हतो.

❖❖❖❖❖